असा. क्र. ५६

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, सप्टेंबर २९, २००८/आश्विन ७, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ—मध्य उप-विभाग

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ सप्टेंबर २००८

**आदेश**

क्रमांक रानिआ/मनपा/२००८/प्र.क्र. ५/का-०५.—ज्याअर्थी, सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ अन्वये महानगरपालिका, नगरपरिषदा, नगर पंचायत निवडणुकांमध्ये उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रीतीने देण्यास कसूर केली तर त्याला तीन वर्षाच्या कालावधीकरिता निवडणूक लढविण्यास अनर्ह ठरविण्याबाबत तरतूद केली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा वेळोवेळी निश्चित केली असून, आदेश क्रमांक एसईसी.१०९५/१०१/डेस्क-३, दिनांक ७ फेब्रुवारी १९९५ अन्वये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाची माहिती निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांत सादर केली पाहिजे, अशी तरतूद केली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ अन्वये केलेली उमेदवारास अनर्ह करण्याबाबतची तरतूद ही केवळ महानगरपालिका, नगरपरिषदा व नगर पंचायत निवडणुकांबाबत आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ झेडए  तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १८अ (४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १४(४), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ च्या कलम ९ब(४) व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०अ(४) तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून असे आदेश देण्यात येत आहेत की, राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ७ फेब्रुवारी १९९५ च्या आदेशान्वये जरी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्याबाबत खर्चाची मर्यादा तसेच खर्चाचा हिशोब सादर करण्याची मर्यादा विहित केली असली तरी शासनाने सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ अन्वये केलेली तरतूद ही केवळ महानगरपालिका, नगरपरिषदा, नगर पंचायतसंदर्भात असल्यामुळे महानगरपालिका, नगरपरिषद व नगर पंचायत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाची माहिती राज्य निवडणूक आयोगाने विहित केल्यानुसार निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या कालावधीमध्ये सादर न केल्यास अशा उमेदवारांना अनर्ह ठरविण्याबाबत कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**रचना नातू,**
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग.



[किंमत : रुपये १८.००]

## प्रपत्र - एक

## निवडणूक खर्चाचा हिशोब विहित वेळेमध्ये न सादर केलेल्या उमेदवारांबाबतची माहिती

महानगरपालिका / नगर परिषदेचे नांव :- निवडणुकीचा दिनांक:-

निकालाचा दिनांक:-

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | उमेदवाराने केलेला खर्च | पक्षाने केलेला व उमेदवारांमध्ये वाटून देण्यात आलेला खर्च | खर्च सादर करण्याचा अंतिम दिनांक | प्रत्यक्ष खर्च सादर केल्याचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

टीपः- (१) ज्या उमेदवारांनी विहित मुदतीनंतर खर्च सादर केला आहे, केवळ त्यांचीच माहिती उपरोक्त नमुन्यात सादर करावयाची आहे.

(२) ज्या उमेदवारांनी खर्चाची माहिती सादर केली नसेल त्यांची नांवेही या यादीत देणे बंधनकारक आहे.

## प्रपत्र - दोन

## निवडणुकीमध्ये विहित मर्यादेबाहेर खर्च केलेल्या उमेदवारांबाबतची माहिती

महानगरपालिका / नगर परिषदेचे नांव :- निवडणुकीचा दिनांक:-

निकालाचा दिनांक:-

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | उमेदवाराने केलेला खर्च | पक्षाने केलेला व उमेदवारांमध्ये वाटून देण्यात आलेला खर्च | एकूण खर्च | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

टीपः- (१) ज्या उमेदवारांनी विहित मर्यादेबाहेर खर्च केला आहे, केवळ त्यांचीच माहिती उपरोक्त नमुन्यात सादर करावयाची आहे.